देशोन्नती

# वयोश्री योजनेत ७ हजार ७४८ अर्ज

## अर्ज करण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन

**नागपूर :** राज्य शासनाने ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा हात म्हणून सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री वयोश्री' या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत नागपूर विभागातून जास्तीत-जास्त पात्र ज्येष्ठ नागरिकांना अर्ज करण्याचे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे. आतापर्यंत या योजनेंतर्गत विभागात ७ हजार ७४८ अर्ज प्राप्त झाले आहेत.

दैनंदिन आयुष्यात ज्येष्ठ नागरिकांना सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमान परत्वे येणाऱ्या अंपगत्व, अशक्तपणावर उपायोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य, साधने खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदींद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी, प्रबोधन व प्रशिक्षणाकरिता या योजनेंतर्गत एकवेळ एकरकमी रुपये ३ हजार लाभार्थ्यांच्या बचत खात्यात थेट वितरित करण्यात येते. नागपूर विभागात या योजनेंतर्गत ३० जुलैपर्यंत एकूण ७ हजार ७४८ अर्ज प्राप्त झाले असून यात सार्वधिक ४ हजार २७८ अर्ज भंडारा जिल्ह्यातून प्राप्त झाले आहेत. नागपूर जिल्ह्यात ७५०, वर्धा २ हजार १००, गोंदिया ३५४, चंद्रपूर २४० आणि गडचिरोली जिल्ह्यातून २६ अर्ज प्राप्त झाले आहेत. पात्र ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन बिदरी यांनी केले आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजनेंतर्गत पात्र ज्येष्ठ लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थतेनुसार चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक, व्हिल चेअर, फोल्डींग वॉकर, कमोड खुर्ची, नी-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाईकल कॉलर खरेदी करता येतील. राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगा उपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनःशांती केंद्र, प्रशिक्षण केंद्र येथे ज्येष्ठांना सहभागी होता येणार आहे. ३१ डिसेंबर २०२३ रोजी वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या, आधार कार्ड असलेल्या व कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

Nagpur Edition
Aug 3, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com